ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
UGC Approved

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

**VOLUME : I ISSUE XIX July - Sep.- 2017**



UGC
Approved
Sr.No.45681

ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE I EDUCATION
MANAGEMENT MEDICAL | ENGINEERING & IT I LAW | PHARMACY
PHYSICAL EDUCATION I SOCIAL SCIENCE | JOURNALISM

PRINCIPAL
Govt. College of ...

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १ | मराठीतील वाङ्मय प्रकार : आत्मचरित्र | डॉ. सौ. कल्पना बोरकर | १ |
| २ | दया पवारांचा 'विटाळ' कथासंग्रह : एक मूल्यमापन | प्रा.सुधीर माने | १० |
| ३ | स्त्रीवाद संकल्पना, स्वरूप व उपयोजन | प्रा.डॉ. लक्ष्मण गीते | १४ |
| ४ | डॉ. विनायक तुमराम यांचे आदिवासी चरित्र वाङ्मयातील स्थान | प्रा. डॉ. अनिल गर्जे<br>श्री. रामचंद्र विठ्ठल माहोरे | १७ |
| ५ | संत तुकारामांची अभंगवाणी | प्रा. रमेश बलभीम जाधवर | १९ |
| ६ | अस्मी एक आशयसंपन्न काव्यसंग्रह | प्रा. डॉ. सुर्यवंशी दिपक सुभाषराव | २२ |
| ७ | डॉ. विनायक तुमराम यांनी आदिवासी कवितेला दिलेले विद्रोही रूप : एक अन्वयार्थ | प्रा. डॉ. अनिल गर्जे<br>श्री. रामचंद्र विठ्ठल माहोर | २६ |
| ८ | भारतीय संविधान आणि उपेक्षित अनुसूचित जमाती | प्रा. चांगदेव निवृत्ती मुंढे | २८ |
| ९ | कैकाडी समाज - एक दृष्टिक्षेप | प्रा. समीर आबनावे | ३२ |
| १० | भारतीय महिला अधिकाराचे उल्लंघन | प्रा. नवगणकर आर.व्ही. | ३४ |
| ११ | हुंडाविरोधी कायदा ! पण मानसिकतेचे काय ? | प्रा.डॉ. हेमंत सोनकांबळे | ३९ |
| १२ | बांगलादेश व सद्यास्थिती: एक आढावा | डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | ४२ |
| १३ | संस्कृत सुभाषितातून मूल्यशिक्षण | प्रा. पंकजा माधव वाघमारे | ४५ |
| १४ | मराठवाड्यातील मतदारसंघ पुनर्रचित १५ व्या लोकसभा निवडणुकीचा अभ्यास : एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. अवचार जी.आर | ५० |
| १५ | भारतीय राष्ट्रीय चळवळीत महिलांचा सहभाग | प्रा.डॉ.देशपांडे सुषमा पद्माकरराव | ५४ |
| १६ | भारतीय अंतर्गत सुरक्षा - समस्या नक्सलवाद और आतंकवाद | डॉ. भांगे चंद्रकांत बन्सीधर | ५६ |
| १७ | हिन्दी की कालयजी कहानी 'गदल' में मानवीय मूल्य | डॉ. सुभाष जाधव | ६० |
| १८ | EFFECT OF NON LEGUMINOUS WEED MANURES ON GREEN LEAFY FODDER MAIZE CROP PRODUCTIVITY ANALYSIS OF TOTAL PLANT | Prakash N. Gholap | ६३ |
| १९ | हिंदी और सिंधी उपन्यासों के विकासक्रम | डॉ. शीला आहुजा | ६७ |
| २० | आधुनिक काल में कथासाहित्य की भूमिका | डॉ. सविता चोखोबा किर्ते | ७२ |
| २१ | मराठवाड्याची कृषी अर्थव्यवस्था आणि हवामान | प्रा.डॉ. गवारे एन.बी. | ७६ |
| २२ | महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पाच्या पाण्याचे अर्थशास्त्र | प्रा.संजय मोतीराम दांदडे, | ७९ |
| २३ | Religious Pluralism and Identity problem in India | Mr. Shaikh Gafoor | ८४ |
| २४ | Indian Muslims: Political Ideology and interreligious harmony | Dr. Farooqui Quayyum M. Younus | ८९ |
| २५ | 21 st Century's Hindi Poetry and Woman Life (With Particular reference to Sunita Jain) | Vaishali S. Rokade,<br>Kaminee A. Ballal | ९४ |




Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science

# संस्कृत सुभाषितातून मूल्यशिक्षण

**प्रा. पंकजा माधव वाघमारे**
सहाय्यक प्राध्यापक, संस्कृत विभाग
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

वैदिक काळात शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट चारित्र्यनिर्मिती व संवर्धन हे होते. मानवाच्या लौकिक व पारलौकिक गरजा ओळखून शिक्षणाची आखणी केलेली होती. त्यामुळेच व्यक्तिच्या वर्तमान नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जोपासना झाली होती. या काळातील शिक्षणातून बौद्धिक, भावनात्मक व शारीरिक विकास साध्य झाला आहे. हेच आजच्या संदर्भातील मूल्यशिक्षण होय. मूल्यशिक्षणाची संकल्पना १९८६ च्या नवीन शैक्षणिक धोरणाने प्रसारित केली असली तरी भारतीय संस्कृतीच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास नहमीच मूल्यशिक्षणावर भारतीय शिक्षणपद्धतीने भर दिलेला दिसून येतो. १९८६ च्या शैक्षणिक धोरणाने अभ्यासक्रम तयार करीत असताना तो मूल्याधिष्ठित केला. भारतीय शिक्षण आयोगाच्या दृष्टिने, "ज्या प्रक्रियेच्या माध्यमातून सामाजिक, आध्यात्मिक व नैतिक मूल्यांचे संस्कार केले जातात, त्याला 'मूल्यशिक्षण' असे म्हणतात."[1]

मुळातच शिक्षणाची दोन उद्दिष्टे आहेत व्यक्तिच्या नैतिक विकास व चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व निर्माण करणे आणि व्यवसायाधिष्ठित शिक्षणाची व्यवस्था करणे. स्वतंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात अनेक आयोग व समित्यांनी चारित्र्यशिक्षण, धार्मिक शिक्षण व नैतिक शिक्षण अशा प्रकारच्या शिफारशी केलेल्या दिसून येतात. १९८६ च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार नैतिक व धार्मिक शिक्षणाला व्यापक अर्थ देऊन मूल्यशिक्षण असा शब्द प्रयोग करण्यात आला. आणि त्यानंतरच मूल्याधिष्ठित शिक्षणाचा आग्रह वाढीला लागला.




त्यामुळे १९८६ च्या शैक्षणिक धोरणाने अभ्यासक्रम तयार करित असताना तो मूल्याधिष्ठित तयार केला.

Govt. College of Arts & Science Aurangabad

श्रमप्रतिष्ठा

[1]मूल्याधिष्ठित शिक्षण (प्रक्रिया आणि उपचार), डॉ. एकनाथ गावंडे, प्रा. अमित गावंडे, नित्यनूतन प्रकाशन
[2]मूल्याधिष्ठित शिक्षण (प्रक्रिया आणि उपचार), डॉ. एकनाथ गावंडे, प्रा. अमित गावंडे, नित्यनूतन प्रकाशन



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

1. श्रमप्रतिष्ठा
2. राष्ट्रभक्ती
3. स्त्री-पुरुष समानता
4. सर्वधर्मसहिष्णुता
5. राष्ट्रीय एकात्मता
6. वैज्ञानिक दृष्टिकोन
7. संवेदनशीलता
8. सौजन्यशीलता
9. वक्तशीरपणा
10. नीटनेटकेपणा

या मूल्यांच्या 'सूची' ला केंद्रस्थानी ठेऊनच शिक्षणाचा आधुनिक आराखडा तयार झालेला आहे. मानवी मूल्य म्हणजे असे विधायक वर्तन की, ज्यातून व्यक्तिविकास, समाजविकास, राष्ट्रविकास व आंतराष्ट्रीय सामंजस्य निर्माण होते.

"Value is defined as enduring belief, a specific mode of conduct or end state of existence along a continuum of importance" - Rokeach[3]

अशी मानवी मूल्याची व्याख्या केली जाते. मानवी मूल्यांचा संबंध नैतिकतेशी आहे. नैतिकता ही मानवी जीवनात सामंजस्य निर्माण करणारी आचारपद्धती आहे.

> "समाजातील रिती-रिवाज, रूढी, आचारपद्धती, अनुकरणीय सत्य व सिद्धांत यांचे संयोजन व संगोपन करुन वर्तनाला आपण इष्ट वळण देत असतो. त्या आचरणाला आपण नैतिक आचरण असे म्हणतो"[4] आणि या नैतिक आचरणाची जाणीव करुन देणे म्हणजे नैतिक शिक्षण होय.

"Moral education is concerned with learning about the way people behave what people are like as person's relationship between people teaching right and wrong and so on."[5]

नैतिक शिक्षण आणि मूल्यशिक्षण हे भिन्न नाहीत. प्राटीन काळात देखील नैतिक शिक्षणावर भर दिला जात असे. नीतिशिक्षणाकरिताच विष्णुशर्म्याने 'पंचतंत्र' या सुप्रसिद्ध ग्रंथाचीरचना केल्याचे सर्वश्रुतच आहे. समाज हा परिवर्तनशील असून बदलत्या राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रवाहात जी नवीन मूल्ये निर्माण होतात ती त्या परिस्थितीला धरुन असतात हे जरी खरे असले तरी काही मूल्ये मात्र बदलत्या काळाच्या ओघातही टिकून राहतात त्यांनाच शाश्वत किंवा चिरंतन मूल्य असे म्हणतात.

[3]मूल्याधिष्ठित शिक्षण (प्रक्रिया आणि उपचार), डॉ. एकनाथ गावंडे, प्रा. अमित गावंडे, नित्यनूतन प्रकाशन
[4]मूल्याधिष्ठित शिक्षण (प्रक्रिया आणि उपचार), डॉ. एकनाथ गावंडे, प्रा. अमित गावंडे, नित्यनूतन प्रकाशन
[5]मूल्याधिष्ठित शिक्षण (प्रक्रिया आणि उपचार), डॉ. एकनाथ गावंडे, प्रा. अमित गावंडे, नित्यनूतन प्रकाशन

PRINCIPAL
Govt. College of Arts & Sci
Aurangabad

प्राचीन भारतीय शिक्षणप्रणालीत देखील या शाश्वत मूल्यांचे संक्रमण होत होते. प्राचीन भारतीय लोक व्यक्तिमत्त्व विकासाबाबत अतिशय जागृत होते. गुरुकुल शिक्षणातून स्वाभिमान व आत्मबल सदैव तेवत ठेवले जात असे. विद्यार्थ्यांना सामाजिक व राजकीय कर्तव्याची जाणीव करुन दिली जात असे संस्कृतीचा प्रसार व प्रचार यावरही भर दिला जात असे.

'संस्कृतं हि संस्कृतेर्मूलम्' । असे म्हणतात संस्कृतभाषा ही संस्कृतीचे मूळ आहे. प्राचीन काळी ज्या काही वाङ्मय आणि शास्त्ररचना झाल्या त्या सर्व संस्कृत भाषेतच आहेत आणि या सर्व वाङ्मयाचे नीतिशिक्षणामध्ये अपूर्व योगदान आहे. जिथे कुठे संधी मिळेल तिथे नीतिचे म्हणजेच सदाचाराचे संवर्धन आणि जोपासना करण्याचा प्रयत्न सर्वच संस्कृत साहित्यकांनी केलेला आहे.

संस्कृत सुभाषितांनी देखील नैतिक शिक्षणाच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. संस्कृत भाषेतील बहुसंख्य सुभाषिते नैतिक शिक्षणाच्या उद्देशानेच अस्तिंत्वात आली आहेत. आधुनिक शिक्षण प्रणालीमध्ये जे मूल्यांचे प्रकार व प्रमाण आहेत त्यांचा शोध संस्कृत सुभाषितातून घेण्याचा प्रयत्न केल्यास ही सर्व मूल्ये जशीच्या तशी या सुभाषित वाङ्मयात निदर्शनास येतात. काही प्रातिनिधिक उदाहरणे पुढीलप्रमाणे

**१. राष्ट्रभक्ती -**

काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी।
देशोऽयं क्षोभरहितः सज्जनाः सन्तु निर्भयाः।।

किंवा

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी!

**२. श्रमप्रतिष्ठा-** या विषयावर तर बहुसंख्य सुभाषिते आहेत. जसे -

उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः।।

किंवा

उद्योगः खलु कर्तव्यः फलं मार्जारवद्भवेत्।
जन्मप्रभृति गौर्नास्ति पयः पिबति नित्यशः।।

श्रमे लक्ष्मी प्रतिष्ठिता। किंवा पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति। इत्यादी

**३. स्त्री-पुरुष समानता-**

अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखः।
भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्य मूलं तरिष्यतः।।

किंवा या संदर्भात मालतीमाधव या बालवयाच्या वधूवरांना दिलेला आशिर्वाद अत्यंत मार्मिक आहे.

प्रेयो मित्रं बन्धुता वा समग्रा
सर्वे कामाः शेवधिर्जीवितं च।
स्त्रीणां भर्त्ता धर्मदाराश्च पुंसा-
मित्यन्योन्यं वत्सयोर्ज्ञातमस्तु।।

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

**४. सर्व धर्म सहिष्णुता-**

यो नः पिता जनिता यो विधाता
धामानि वेद भुवनानी विश्वा।
यो देवानां नामधा एक एव
तं संप्रश्नं भुवना यस्त्न्या।।

किंवा - अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम्। इत्यादी

**५. राष्ट्रीय एकात्मता-**

समानी व आकूतिः समाना ह्रदयानि वः।
समानमस्तु वो मनो यथा वः सुमहासति।।
आणि
ॐ सहनाववतु सह नौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै।
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै।।

**६. वैज्ञानिक दृष्टिकोण**-या मध्ये आधुनिक शिक्षणप्रणालीत अंधश्रद्धेला अथवा लोकापवादाला बळी न पडता पडता विज्ञाननिष्ठ किंवा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन ठेवावा असे अपेक्षित आहे. खालील सुभाषित हे त्या दृष्टीने बोलके आहेत.

प्राज्ञो हि जल्पतां पुंसां श्रुत्वा वाचः शुभाशुभाः।
गुणवद्वाक्यमादत्ते हंसः क्षीरमिवाम्भसः।।

किंवा अंधश्रद्धेवर भाष्य करणारे

अस्य मूर्खस्य यागस्य दक्षिणा महिषीशतम्।
त्वयार्धं मयार्धं च विघ्नं मा कुरु पण्डितः।।

हे सुभाषित प्रचलित आहे.

**७. संवेदनशीलता**- हे महत्त्वाचे मानवी मूल्या आहे यामध्ये १. परोपकार २. परस्पर साहचर्य ३. भावनिक अनुबंध इ. गोष्टी अंतर्भूत आहेत आणि सुभाषित वाङ्मयात तर या विषयावरची जंत्रीच पहायला मिळते.

निर्गुणेष्वपि हि सत्त्वेषु दयां कुर्वन्ति साधवः।
किंवा
छायामन्यस्य कुर्वन्ति तिष्ठन्ति स्वयमातपे।
फलानि च परार्थाय वृक्षाः सत्पुरुषाःइव।।इत्यादी

**८. सौजन्यशीलता** - या विषयावर देखील सुभाषितांची रेलचेलच पहायला मिळते. जसे-

घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चन्दनं चारुगन्धम्
छिन्नं छिन्नं पुनरपि पुनः स्वादु चैवेक्षुकाण्डम्।

Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

दग्धं दग्धं पुनरपि पुनः काञ्चनं कान्तवर्णं
प्राणान्तेऽपि प्रकृतिविकृतिर्जायते नोत्तमानाम्।।

**९. वक्तशीरपणा -**

आलस्य हि मनुष्याणां शरिरस्थो महारिपुः।
किंवा
न कूपखननं युक्तं प्रदीप्ते वह्निना गृहे।

**१०. नीटनेटकेपणा-**

नरो हिताहारविहारसेवी समीक्षकारी विषयेष्वसक्तः।
दाता समः सत्यपरः क्षमावान् आप्तोपसेवी भवत्यरोगः।।

किंवा
एकेनापि हि शूरेण पादाक्रान्तं महीतलम्।
क्रियन्ते भास्करेणेव स्फारस्फुरिततेजसा।।

अशा रितीने आधुनिक शिक्षणपद्धतीत समाविष्ट केलेल्या मूल्यांवर आधारित अनेक सुभाषिते संस्कृत साहित्यात पाहायला मिळतात. हजारोंच्या संख्येने रचल्या गेलेल्या सर्वच सुभाषितांनी मूल्यशिक्षणाचे कार्य केले आहे.

आचारः परमो धर्मः आचारः परमं तपः।
आचारः परमं ज्ञानमाचारात् किं न साध्यते।।

असा विचार असलेल्या संस्कृत सुभाषितांचे मूल्यशिक्षणामध्ये अद्वितीय असे योगदान आहे. फार प्राचीन काळापासून ही सुभाषिते मानवाला मार्गदर्शक आणि प्रेरक ठरलेली आहेत. आजच्या काळातही अत्यंत उपयुक्त ठरतील अशी दिशादर्शक तत्त्वे या सुभाषितांमध्ये विद्यमान आहेत. मूल्यशिक्षणाच्या संदर्भात सुभाषितांचे योगदान या विषयावर भरीव आणी मूलगामी संशोधन होणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे आधुनिक शिक्षण प्रणालीमध्ये मूल्यशिक्षणाच्या बाबतीत संस्कृत सुभाषितांचे योगदान लक्षात घेऊन अभ्यासक्रमामध्ये त्याचा स्वतंत्र आराखडा तयार करुन समाविष्ट केल्यास मूल्यशिक्षणाचे उद्दिष्ट पूर्णत्वाकडे जाण्यास निश्चितच मदत होईल.

**संदर्भग्रंथसूची-**

१. मूल्याधिष्ठित शिक्षण (प्रक्रिया आणि उपचार), डॉ. एकनाथ गावंडे, प्रा. अमित गावंडे, नित्यनूतन प्रकाशन
२. संस्कृत साहित्य का इतिहास, आचार्य बलदेव उपाध्याय, शारदा निकेतन, वाराणसी
३. संस्कृत-मराठी सुभाषित कोश, डॉ. रुपाली कापरे
४. संस्कृत सुभाषित सरिता (संकलक), वि. कृ. श्रोत्रिय

Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science